१२ व्या वित्त आयोग २००९-१० अंतर्गत राघोबादादावाडा, कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर जतन व दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

शासन निर्णय क्रमांक: पुवसं-२०१९/प्र.क्र.७/सां.का.३

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- २६ फेब्रुवारी, २०१९.

वाचा : १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक केशान २००९/प्र.क्र.१७४/सां.का.३, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१०.

२. संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय मुंबई यांचे जा.क्र.स्मारके/ २०१९/ ६१, दिनांक १०.०१.२०१९ चे पत्र.

प्रस्तावना:-

केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत राज्यातील प्राचीन वास्तुंचे जतन व संरक्षणासाठी १२ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २००६-०७, २००७-०८, २००८-०९, २००९-१० करीता प्रत्येकी रू.१२.५० कोटी प्रमाणे एकूण रू.५०.०० कोटी इतका निधी चार टप्प्यात मंजूर झाला होता. त्यापैकी रू.४९,८४,६५,९९२/- इतका निधी विभागास प्राप्त झाला. प्राप्त निधीपैकी रू.४७,००,९९,८२२/- इतका निधी खर्च झाला व रू.२,८३,६६,१७०/- इतका निधी अखर्चित राहिला. सदर अखर्चित निधींपैकी रू.६४,१६,७६८/- इतका निधी मार्च २००७ अखेर व्यपगत झाला व स्वीय प्रपंजी लेख्यात शिल्लक असलेला उर्वरीत रू.२,१९,४९,४०२/- इतका निधी लेखा परीक्षण तपासणीक निर्देशानुसार दि.०६.१०.२०१७ रोजी चलनाद्वारे शासन खाती जमा करण्यात आला आल्याचे संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने उपर्निदिष्ट क्र.२ च्या पत्रान्वये नमूद केले आहे. उपर्निदिष्ट क्र.१ च्या शासन निर्णयान्वये १२ व्या वित्त आयोग २००९-१० अंतर्गत राघोबादादावाडा, कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर या राज्य संरक्षित स्मारका- करिता रू.१.१७ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी प्रत्याक्षात रू.१,०७,१४,७४१/- इतकी रक्कम खर्च झाली असून सदर राज्य संरक्षित स्मारकाकरिताची रू.९,८५,२५९/- इतकी रक्कम अखर्चित राहिली आहे. त्यानुसार १२ व्या वित्त आयोग २००९-१० अंतर्गत राघोबादादावाडा, कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन दुरूस्ती कामांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

या शासन निर्णयान्वये १२ व्या वित्त आयोग २००९-१० अंतर्गत राघोबादादावाडा, कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन दुरूस्ती कामांच्या रू.९,८५,२५९/- (अक्षरी रूपये नऊ लाख पंच्च्यांशी हजार दोनशे एकोणसाठ फक्त) इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासकीय मान्यतेनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करुन याप्रकरणी न्युनत्तम निविदेचा प्रस्ताव तसेच खर्चास वित्तीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर केल्यानंतर प्रस्तावित खर्चास वित्तीय मान्यता देण्यात येईल.

हा शासन निर्णय विअप्र -२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/ विनियम, भाग २, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग तीन मधील अनुक्रमांक ४ मधील परिच्छेद क्र. २७ (२) "अ" नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०२२६१०५२१०४२२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shailesh Tukaram Jadhav

Digitally signed by Shailesh Tukaram Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f28af075ed91b64d12528e9ab00bb144f43fcf33c23ccf14c820b969f8ca273, serialNumber=a90555ec4a073187eb44ee0b1aa93e5c855afff34eedb4b03bb3e0a6cfd6271c, cn=Shailesh Tukaram Jadhav
Date: 2019.02.27 18:49:00 +05'30'

(शै.तु.जाधव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक , पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, नाशिक
३. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (१ व २ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
४. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा), मुंबई
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
६. जिल्हा कोषाधिकारी, नाशिक
७. अवर सचिव (अर्थसंकल्प),पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
८. निवड नस्ती, सां.का.३